पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी
* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटार वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / प्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक २९ वा | शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# बबलाद शाळा दुर्घटनेने प्रशासनाची पोलखोल; दोष दोरीला की यंत्रणेला?

## बबलाद दुर्घटनेवरून जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत खडाजंगी

## 'साडीच्या दोरीमुळे छत कोसळले'चा दावा ग्रामस्थांनी फेटाळला

## शाळेच्या इमारतीचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेच्या गुरुवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत धोकादायक शाळांच्या इमारतींचा प्रश्न चांगलाच गाजला. अक्कलकोट तालुक्यातील बबलाद येथील शाळेच्या दुर्घटनेचे पडसाद सभागृहात उमटले. शिवसेना शिंदे गटाचे सदस्य शिवराज म्हेत्रे यांनी प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आक्रमक भूमिका घेतली. त्याला भाजपच्या सदस्य शांभवी कल्याण शेट्टी यांनी प्रत्युत्तर देत प्रशासनाची बाजू मांडली. त्यामुळे सभागृहात अक्कलकोटच्या राजकारणाचेही पडसाद उमटल्याचे चित्र पाहायला मिळाले.

बबलाद येथील शाळेची इमारत नादुरुस्त असल्याबाबत १८ मे २०२६ रोजी प्रशासनाला पत्र देण्यात आले होते. त्यानंतर तीन वेळा पाठपुरावा करूनही दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप म्हेत्रे यांनी केला. निधी उपलब्ध नसल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात होते. मात्र, सभेत तब्बल एक कोटी ८३ लाख रुपये निधी शिल्लक असल्याची माहिती देण्यात आली. मग हा निधी कुठे आहे आणि धोकादायक इमारतींच्या दुरुस्तीसाठी त्याचा वापर का झाला नाही, असा सवाल म्हेत्रे यांनी उपस्थित केला.

बबलाद दुर्घटनेप्रकरणी मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांवर करण्यात आलेली कारवाई चुकीची असून, त्याऐवजी संबंधित ठेकेदार व गटशिक्षणाधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी, अशी मागणी म्हेत्रे यांनी केली. संबंधितांवर कलम ३०६ अन्वये कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, शांभवी कल्याणशेट्टी यांनी चर्चेत सहभागी होत प्रशासनाची बाजू मांडली. बबलादची घटना दुर्दैवी आहे. मात्र, संबंधित शाळेची इमारत सुमारे ३० ते ३५ वर्षांपूर्वीची आहे. दुर्घटनेत स्लॅब नव्हे तर पीओपीचा भाग कोसळला असून, १३ विद्यार्थी व दोन शिक्षक जखमी झाले आहेत. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, मुख्य कार्यकारी अधिकारी कौशल जैन आणि शिक्षणाधिकारी यांनी तत्काळ घटनास्थळी व रुग्णालयात धाव घेत जखमींची विचारपूस केली. प्रशासनाने या प्रकरणात संवेदनशीलता दाखवली असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, जिल्ह्यातील उर्वरित शाळांच्या इमारतींचे स्ट्रक्चर ऑडिट करून घेण्याची मागणी सदस्यांनी केली. भविष्यात अशा दुर्घटना घडू नयेत यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घ्यावी, अशी मागणीही करण्यात आली. पृथ्वीराज माने यांनी ३५ वर्षे जुन्या शाळांच्या इमारतींचे स्ट्रक्चर ऑडिट करून त्याचे काम पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना देण्याची सूचना केली. व्यंकटराव भालके यांनी स्ट्रक्चर ऑडिटची माहिती सदस्यांना देण्याची मागणी केली.

सभेच्या प्रारंभी राष्ट्रगीत व राज्यगीत झाले. त्यानंतर दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्यांच्या अभिनंदनाचा ठरावही मांडण्यात आला.

### इतर मागण्या–

सोनाली खडसे यांनी प्रशासक काळातील निधी खर्चाची माहिती देण्याची मागणी केली. अण्णा भोसले यांनी जिल्हा परिषद सदस्यांसाठी मेडिक्लेम व विमा योजना सुरू करण्याची मागणी केली.

दरम्यान, दुर्घटनेच्या कारणावरून प्रशासन आणि ग्रामस्थ आमनेसामने आले आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी पाहणीनंतर छताला साडीच्या दोरीने झोका बांधल्यामुळे दुर्घटना घडल्याचे सांगितल्याचा दावा करण्यात आला. मात्र, ग्रामस्थ आणि पालकांनी हा दावा फेटाळून लावत इमारतीच्या बांधकामाची गुणवत्ता आणि देखभालीचा प्रश्न उपस्थित केला आहे.

बबलाद हे अक्कलकोट तालुक्यातील कर्नाटक सीमेलगतचे गाव. येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेची इमारत सुमारे ३५ वर्षे जुनी असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. २०२० मध्ये आलेल्या महापुरात शाळेच्या इमारतीत पाणी शिरून मोठे नुकसान झाले होते. त्यानंतर इमारतीची तांत्रिक तपासणी किंवा स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले होते का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

### दोरीचा मुद्दा नेमका कुठून आला?

दुर्घटनेनंतर प्रशासनाकडून झोका बांधण्यासाठी वापरलेल्या साडीच्या दोरीचा मुद्दा पुढे करण्यात आला. मात्र, घटनास्थळी दोरीचा वापरच झाला नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाने हा निष्कर्ष नेमका कोणत्या पाहणीच्या आधारे काढला, असा प्रश्न पालकांनी उपस्थित केला आहे. दुर्घटनेचे कारण एका वस्तूच्या वापरापुरते मर्यादित न ठेवता इमारतीची संरचनात्मक स्थिती, छताची मजबुती, पूर्वीचे नुकसान आणि देखभालीचा अभाव या सर्व बाबींची तांत्रिक तपासणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### मुख्याध्यापकांनी पूर्वीच इशारा दिला होता?

शाळेच्या इमारतीबाबत यापूर्वीच शिक्षण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करण्यात आल्याचा दावा मुख्याध्यापकांकडून करण्यात आला आहे. इमारतीच्या सुरक्षिततेबाबत प्रशासनाच्या निदर्शनास बाब आणून दिली होती, मात्र त्यावर अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचेही सांगण्यात येत आहे.

जर इमारतीच्या धोकादायक स्थितीची माहिती यापूर्वीच देण्यात आली होती, तर त्यानंतर प्रशासनाने कोणती कार्यवाही केली? संबंधित अधिकाऱ्यांनी इमारतीची पाहणी केली होती का? तांत्रिक अहवाल तयार करण्यात आला होता का? या प्रश्नांची उत्तरे आता पालक आणि ग्रामस्थ मागत आहेत.

### विद्यार्थी जखमी; जबाबदारी कोणाची?

दुर्घटनेच्या वेळी विद्यार्थी शाळेत खेळत असताना अचानक छताचा भाग कोसळल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले आहे. या घटनेत विद्यार्थी आणि शिक्षक जखमी झाले. त्यानंतर उपचाराची प्रक्रिया आणि विद्यार्थ्यांना घरी पाठविण्याच्या घाईबाबतही पालकांनी नाराजी व्यक्त केली. विशेष म्हणजे, घटनेनंतर मुख्याध्यापकांना नोटीस बजावण्यात आल्यानेही ग्रामस्थांमध्ये संताप आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेला असताना केवळ मुख्याध्यापकांवर कारवाई करण्याऐवजी इमारतीची देखभाल, बांधकामाची गुणवत्ता आणि संबंधित यंत्रणेची जबाबदारीही निश्चित करावी, अशी मागणी होत आहे.

### आता पुढचा प्रश्न : विद्यार्थी कुठे शिकणार?

दुर्घटनेनंतर सर्वात महत्त्वाचा प्रश्न विद्यार्थ्यांच्या सुरक्षित शिक्षणाचा आहे. धोकादायक इमारतीत विद्यार्थ्यांना बसविणे टाळून त्यांच्यासाठी तात्पुरती सुरक्षित पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी पालकांनी केली आहे.

ग्रामस्थांनी शाळेचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करावे, दुर्घटनेचे निष्पक्ष तांत्रिक कारण निश्चित करावे, दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांची जबाबदारी ठरवावी आणि विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे.

१५ ऑगस्टच्या पार्श्वभूमीवर शाळांमध्ये विविध उपक्रमांची तयारी सुरू असताना बबलादमधील विद्यार्थी मात्र सुरक्षित इमारतीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे हा प्रश्न केवळ एका शाळेच्या इमारतीचा राहिलेला नसून ग्रामीण भागातील शाळांच्या सुरक्षिततेचा बनला आहे.

दोरीमुळे छत कोसळले की इमारतीच्या संरचनात्मक त्रुटींमुळे दुर्घटना घडली, याचा अंतिम निर्णय तांत्रिक तपासणीतूनच होणार आहे. मात्र, तपासाचा निष्कर्ष येईपर्यंत विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण होणार नाही, याची जबाबदारी प्रशासनाने घेणे गरजेचे आहे.

### कुंभारीच्या शाळेत मद्यपींचा धिंगाणा

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील प्राथमिक शाळेत सुरक्षा व्यवस्था नसल्याने मद्यपींकडून दिवस-रात्र धिंगाणा घातला जात असल्याचा गंभीर आरोप सदस्य श्रुती बोरगुंडे यांनी केला. शाळेच्या परिसरात जुगाराचे प्रकारही सुरू असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचे काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. अनेक शाळांमध्ये पुरेशी स्वच्छतागृहे व पाण्याची सुविधा नसल्याचेही त्यांनी सांगितले. सचिन जाधव यांनी शाळांना स्मार्ट टीव्ही व डिजिटल साधने उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

### कुर्डू येथे शेळ्यांच्या गोठ्यात भरते शाळा

कुर्डू येथे शाळेची स्वतंत्र इमारत नसल्याने प्राथमिक शाळा शेळ्यांच्या गोठ्यात भरत असल्याचा धक्कादायक मुद्दा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे सदस्य अण्णासाहेब ढाणे यांनी उपस्थित केला. शिक्षक स्वतःच्या पगारातून खासगी जागा भाड्याने घेऊन शाळा चालवत असल्याचे त्यांनी सांगितले. अशा ठिकाणी विद्यार्थ्यांचे बरे-वाईट झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल त्यांनी केला. शिक्षण समितीचे सभापती चेतनसिंह केदार व समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते यांनी चर्चेत भाग घेत, महिनाभरात जागेचा प्रश्न मार्गी लावण्याची सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी कौशल जैन यांना केली. भाजप सदस्य नेताजी खंडागळे यांनी धोकादायक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बसवू नये आणि पर्यायी ठिकाणी तात्पुरती व्यवस्था करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली.

### विद्यार्थ्यांचे गणवेश निकृष्ट दर्जाचे

सांगोला तालुक्यातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेले गणवेश निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप सदस्य दादासाहेब लवटे यांनी केला. गणवेश महिला बचत गटांकडून खरेदी न करता बाहेरील विक्रेत्यांकडून खरेदी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. गणवेशाचे बटन, चैन व माप व्यवस्थित नसून काही विद्यार्थिनींचे गणवेश पायात लोळत असल्याने त्यांना चालण्यासही अडचण येत असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले. याप्रकरणी चौकशी समिती नियुक्त करून निकृष्ट गणवेशाची तपासणी करण्याचे आदेश सभागृह नेत्या रश्मी बागल यांनी दिले.

## 'मास लॉ असोसिएट्स'चा प्रथम वर्धापन दिनानिमित्त 'विधिमित्र पुरस्कार' सोहळा



देवीदास घोडके | आतिश शिरसट | ॲड. आझमुद्दीन शेख | ॲड. गीताराणी घनाते | श्रीनिवास – चेअरमन | आफताब शेख | हरिश्चंद्र कदम

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** न्यायसेवा आणि समाजसेवा यांचा संगम साधत कायदेविषयक जनजागृतीसाठी कार्यरत असलेल्या मास लॉ असोसिएट्स, सोलापूरच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त 'विधिमित्र पुरस्कार' सोहळा होणार असल्याची माहिती मास लॉ असोसिएट्सचे संस्थापक अध्यक्ष ॲड. मोहन कुरापाटी, ॲड. अनिल वासम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मास लॉ असोसिएट्सची स्थापना १५ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात आली. 'Justice is the sum of all moral duty.' हे ब्रीदवाक्य स्वीकारून संस्था न्याय, सामाजिक बांधिलकी आणि कायदेविषयक जनजागृतीच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे.

### समाजाभिमुख उपक्रमांचा वर्षभराचा प्रवास

गेल्या वर्षभरात मास लॉ असोसिएट्सच्या माध्यमातून विविध समाजाभिमुख उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये मोफत विधी साक्षरता शिबिरे, मोफत कायदेशीर मार्गदर्शन शिबिरे, मोफत कौटुंबिक समुपदेशन तसेच शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी कायदेविषयक प्रशिक्षण यांचा समावेश आहे.

सर्वसामान्य नागरिकांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करणे, नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती करून देणे आणि न्यायप्रक्रियेबाबत त्यांना सक्षम करणे, हा संस्थेच्या या उपक्रमांचा प्रमुख उद्देश आहे.

### विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववानांचा 'विधिमित्र पुरस्काराने' सन्मान

समाजात न्याय, सत्य, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक उत्तरदायित्व जपत निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींच्या योगदानाचा गौरव व्हावा, त्यांच्या कार्यातून समाजाला प्रेरणा मिळावी आणि सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने यंदा 'विधिमित्र पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहेत.

या पुरस्कार सोहळ्यास, सोलापूर शहराचे मा. पोलिस आयुक्त, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. श्रीनिवास क्यातम, डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यावेळी पुरस्कारार्थींचा सन्मान करण्यात येणार असून, सोलापूर बार असोसिएशनच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचाही सत्कार करण्यात येणार आहे. तसेच नूतन उत्तीर्ण न्यायाधीश मा.विजय कोंडा आणि पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठात एल.एल.एम. च्या परीक्षेत सुवर्णपदक पटकावलेले अमर जिंदम यांचाही विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

न्याय आणि सामाजिक बांधिलकीचा वसा पुढे नेण्याचा संकल्प मास लॉ असोसिएट्सच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित हा सोहळा केवळ पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम नसून, न्यायव्यवस्था, सामाजिक सेवा, शिक्षण, प्रसारमाध्यमे आणि श्रमक्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा सार्वजनिक गौरव करण्याचा आणि सामाजिक बांधिलकीचा वसा अधिक व्यापक करण्याचा उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले.

15 ऑगस्ट रोजी सायंकाळी ठीक 6 वाजता एम.आय.डी.सी. पोलिस ठाणे जवळ टेक्सटाइल डेव्हलपमेंट फाऊंडेशन हॉल येथे संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमास विधीज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रांतील मान्यवर, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस मास लॉ असोसिएट्सचे संस्थापक अध्यक्ष ॲड. मोहन कुरापाटी, ॲड. अनिल वासम, ॲड. धनंजय वांझरे, ॲड. शाम आडम आदींची उपस्थिती होती.

**पुरस्कारार्थी मान्यवर पुढीलप्रमाणे :**

१. विधिमित्र श्रमप्रतिष्ठा पुरस्कार
देवीदास घोडके — शिपाई, वालचंद महाविद्यालय

२. विधिमित्र सामाजिक सेवा पुरस्कार
आतिश शिरसट — संभव फाउंडेशन

३. विधिमित्र विधी सेवा पुरस्कार
ॲड. आझमुद्दीन शेख — जिल्हा व सत्र न्यायालय
ॲड. गीताराणी घनाते — जिल्हा व सत्र न्यायालय

४. विधिमित्र शैक्षणिक सेवा पुरस्कार
श्रीनिवास — चेअरमन, भू. म. पुल्ली कन्या प्रशाला

५. विधिमित्र प्रसारमाध्यम सेवा पुरस्कार
आफताब शेख — ABP माझा
हरिश्चंद्र कदम — दैनिक संचार

## मोडकळीस आलेल्या शाळा इमारतीच्या स्थलांतराचा मार्ग मोकळा

## उच्च न्यायालयाचे प्रशासनाला निर्देश



ॲड रंजना देवकर | ॲड.विश्वासराव देवकर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील बाळीवेस परिसरातील आदर्श विद्या मंदिर शाळेची मोडकळीस आलेली इमारत विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरत असल्याने तिच्या तातडीच्या स्थलांतराचा मार्ग आता मोकळा झाला आहे. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सोलापूर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकाऱ्यांना स्थलांतराबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाच्या या आदेशामुळे शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याबाबत ॲड. विश्वासराव देवकर यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

बाळीवेस येथील आदर्श विद्या मंदिर शाळेत सन १९५२ पासून प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या दोन शाळा जुन्या इमारतीमध्ये सुरू आहेत. सदर शाळेची इमारत मोडकळीस आलेली असून, ती शाळा चालविण्यासाठी अत्यंत धोकादायक असल्याचे महानगरपालिकेच्या स्तरावरून यापूर्वी नमूद करण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून शाळा अन्यत्र स्थलांतरित (पान 2 वर..)




## संपादकीय

# प्रश्न राजकीय पक्षांच्या विश्वासार्हतेचा

पुरंदर आणि पालघरच्या घटनांनी कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्न निर्माण होतो. महाराष्ट्रात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पुरंदरमधील अल्पवयीन मुलीवरील कथित अत्याचाराची घटना आणि पालघरमध्ये अपघातग्रस्त तरुणीच्या असहायतेचा गैरफायदा घेतल्याचा आरोप असलेली घटना या केवळ दोन गुन्हेगारी प्रकरणे म्हणून दुर्लक्षित करता येणार नाहीत. या घटनांनी समाजाच्या सुरक्षिततेबरोबरच कायदा-सुव्यवस्थेच्या यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. महिला किंवा अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्यानंतर राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू होतात. सरकार विरोधकांवर राजकारणाचा आरोप करते आणि विरोधक सरकारला जबाबदार धरतात. मात्र, या दोन्हींपलीकडे सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. सामान्य नागरिकाला सुरक्षित वातावरण कधी मिळणार? गुन्हा घडल्यानंतर आरोपींना अटक करणे ही पोलिसांची जबाबदारी आहेच. पण गुन्हा घडण्यापूर्वी प्रतिबंधात्मक यंत्रणा किती प्रभावी आहे, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. कायद्याचा धाक निर्माण झाला नाही, तपास वेगाने झाला नाही आणि दोषींना कठोर शिक्षा होण्याची खात्री निर्माण झाली नाही, तर गुन्हेगारांच्या मनात कायद्याची भीती कशी निर्माण होणार? महिलांच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे, जलद तपास, सक्षम पोलिस यंत्रणा, संवेदनशील प्रशासन आणि वेगवान न्यायप्रक्रिया या सगळ्यांची एकत्रित गरज आहे. केवळ नवीन कायदा करण्याची घोषणा करून किंवा कठोर शिक्षेची भाषा करून समस्या सुटणार नाही. कायद्याची अंमलबजावणी आणि दोषींना शिक्षा होण्याचा वेग हेच खरे प्रतिबंधक ठरतात. 'शक्ती कायदा' लागू करण्याची मागणी महाराष्ट्रात सातत्याने होत आहे. या मागणीवर सरकारने राजकीय सोयीने मौन न बाळगता कायदेशीर प्रक्रिया कुठपर्यंत आली आहे, अडथळे कोणते आहेत आणि पुढची दिशा काय, हे जनतेसमोर स्पष्ट केले पाहिजे.मात्र, येथे एक गोष्ट तितकीच स्पष्ट असली पाहिजे, एखादा कायदा प्रलंबित आहे म्हणून प्रत्येक गुन्ह्याला सरकारच थेट जबाबदार आहे, असा निष्कर्ष काढणेही योग्य ठरेल. प्रत्येक प्रकरणात तपास, पुरावे, आरोपींची भूमिका आणि न्यायालयीन प्रक्रिया यांचा स्वतंत्र विचार होणे आवश्यक आहे. हा वेगळा मुद्दा आहे.तरीही सरकारची जबाबदारी कमी होत नाही. गृहविभागाने केवळ गुन्हे घडल्यानंतर प्रतिक्रिया देण्यापेक्षा गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांची उपस्थिती, संवेदनशील ठिकाणी सुरक्षा, महिलांसाठी तातडीची मदत यंत्रणा आणि जलद तपास यावर भर देणे गरजेचे आहे. महिलेला रात्री रस्त्यावरून जाताना, प्रवास करताना किंवा संकटात सापडल्यानंतर मदत मागताना भीती वाटत असेल, तर विकासाच्या कितीही घोषणा केल्या तरी त्या समाजाच्या सुरक्षिततेच्या कसोटीवर अपुऱ्या ठरतात.सरकारला प्रत्येक गुन्हा घडण्यापूर्वी रोखता येईलच असे नाही. पण गुन्हेगाराला कायद्याची भीती वाटेल, पीडितेला तातडीने मदत मिळेल आणि दोषी सुटणार नाही, अशी व्यवस्था निर्माण करणे सरकारच्या हातात नक्कीच आहे.म्हणून प्रश्न केवळ 'शक्ती' कायदा कधी?' हा नाही. प्रश्न आहे, आज अस्तित्वात असलेल्या कायद्यांचा धाक किती आहे? महिलांची सुरक्षा ही राजकीय घोषणेची नव्हे, तर शासनाच्या कार्यक्षमतेची खरी परीक्षा आहे.गुन्हेगाराला मोकळे रान मिळू नये, पीडितेला न्यायासाठी वर्षानुवर्षे वाट पाहावी लागू नये आणि महाराष्ट्रातील प्रत्येक महिला सुरक्षितपणे जगू शकेल, यासाठी सरकारने आता भाषणांपेक्षा कृती दाखवण्याची वेळ आली आहे.

# स्वतंत्र पुर्वकाळात युवा पिढीने स्वतंत्र्यासाठी लढा दिला

आता जेन-झी हक्कासाठी लढत आहे,यात त्यांना राजकारण नको न्याय हवा!
देशात जेन-झी आपल्या हक्कांसाठी लढत आहे आणि सरकार व पक्ष-विपक्ष स्वाथार्साठी राजकारण करीत आहे. आता युवा पिढी कोणतेही राजकारण खपवून घेणाच्या तयारीत नाही. कारण त्यांची सहनशीलता संपली असून आरपारच्या लढाईत असल्याचे दिसून येते.जेन-झीवर होत असलेला अन्याय फक्त जंतरमंतर किंवा नीट किंवा झारखंड पुरता सिमीत रहाला नसून हा संपूर्ण देशभरातील जेन-झीवर होत असलेल्या अन्यायाविरूद्धचा मोठा लढा आहे.याची जाणीव सरकारने,पक्ष-विपक्षांनी व राजकारण्यांनी ठेवली पाहिजे. देशातील प्रत्येक राज्यात कोणत्या-ना-कोणत्या विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला दिसुन येतो याचे जिवंत उदाहरण देशाच्या १४५ कोटी जनतेच्या डोळ्यांपुढे आहे.त्यामुळे सर्वच राज्यातील भ्रष्ट नितीचा उलगडा करण्यासाठी प्रत्येक राज्यामध्ये तुकाराम मुंढे सारखे कर्तव्यनिष्ठ प्रशासकीय अधिकारी (मुख्य सचिवपदी) असने आवश्यक आहे आणि याचे स्वागत सर्वच स्तरातून होईल. कारण शिक्षण,आरोग्य,खानपान, महागाई, रोजगार या संपूर्ण ठिकाणी भ्रष्टाचाराची किड लागली आहे.या भ्रष्ट नितीचा नायनाट करण्यासाठी जेन-झीचा उदय झाला.आज जेन-झी जंतरमंतर पासून तर झारखंड पर्यंत आणि झारखंड पासून संपूर्ण देशात जेन-झी आपल्या हक्कांसाठी संपूर्ण शक्तीनिशी संघर्ष करीत आहेत. जंतरमंतर वर नीट पेपर फुटीसाठी आंदोलन झाले;तर झारखंडमध्ये ढासळती शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी आंदोलन सुरू आहे.परंतु यात सर्व विद्यार्थाचा एक उद्देश आहे की,राज्यासह देशातील शिक्षण व्यवस्था पारदर्शक, स्वच्छ आणि सुरक्षित रहाली पाहिजे व विद्यार्थ्यांच्या परीश्रमाला आणि मेहनतीला यश यावे हाच उद्देश देशातील युवा पिढीचा आहे त्यासाठीच राज्यात किंवा देशात युवा पिढी आंदोलन करतांना दिसतात. आपण पहाले की, जंतरमंतरवर विद्यार्थ्यांचे तब्बल ३५ दिवस आंदोलन चालले यात सोनम वांगचूक यांनी २० दिवस उपोषण सुध्दा केले यानंतर विद्यार्थ्यांच्या आग्रहाखातर त्यांनी उपोषण मागे घेतले. आंदोलनादरम्यान लाठीचार्ज, पायलट गनचा वापर, बिहारमध्ये एके-४७ चा वापर अशा प्रकारे बळाचा वापर करण्यात आला व शेवटी धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला व ३६ व्या दिवशी जंतरमंतरवरील आंदोलन समाप्त झाले.या आंदोलनात संपूर्ण विपक्ष एकत्र झालेला आपण पाहिला.कारण केंद्र सरकारने सांगितले की, राजीनामा पध्दत आमच्या सरकारमध्ये नाही. अशाप्रकारचे सत्तेचे घमंड केंद्र सरकारला असल्याने सरकार झुकायला तयार नव्हते.परंतु जेन-झी ची आक्रमकता व संपूर्ण एकवटलेला विपक्ष पाहून शेवटी धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला.यानंतर पंजाबमध्ये पेपर फुटीप्रकरण उघडकीस आले यात भाजपने पंजाब सरकारला घेरने सुरू केले व विरोधकांवय वार-प्रतीवार सुरू झाला. यानंतर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला झारखंडमध्ये सुरुवात झाली.झारखंडमध्ये गैरभाजपा सरकार असल्याने झारखंडच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ भाजपा संपूर्ण शक्तीनिशी उतरला व याचे पडसाद लोकसभेत सुध्दा दिसून आले.त्यामुळे आता केंद्र सरकार विरोधकांना विचारत आहे की,आपण झारखंडच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या दरम्यान चुप का? असे अनेक प्रश्न झारखंडमधील विरोधी पक्ष भाजप व केंद्र सरकार , विरोधकांना व झारखंड सरकारला विचारत आहे.परंतु जंतरमंतरवरील आंदोलन असो अथवा पंजाब मधील आंदोलन असो अथवा झारखंडमधील विद्यार्थ्यांचे आंदोलन असो यावर तोडगा काढायला कोणीही तयार नाही. कारण केंद्र सरकारला ज्या राज्यात त्यांची सरकार नाही त्या राज्यात त्यांना राजकारण करायचे आहे;तर विरोधकांना भाजप शासीत प्रदेशात व केंद्र सरकारच्या विरूद्ध राजकारण करून आपापला हेतू साध्य करण्यासाठी लागले आहेत. अशा घाणेरड्या व घृणास्पद राजकारणामुळे युवा पिढीचे मोठ्या प्रमाणात भविष्याचे नुकसान होत आहे.याकरीता देशातील संपूर्ण राजकारण्यांनी (पक्ष-विपक्ष) यांनी एकत्र येऊन जेन-झी च्या मागण्यांवर गांभीयार्ने विचार करायला पाहिजे.पक्ष-विपक्ष स्वतःच्या स्वाथार्साठी कितीही राजकारण करीत असले तरी आता जेन-झी थांबणार नसल्याचे दिसून येते.कारण जेन-झीचे आंदोलन जरी जंतरमंतरवरून सुरू झाले असले तरी त्याची ठिणगी येत्या काही दिवसांत संपूर्ण देशभर पसरण्याची दाट शक्यता असुन वनवा लागु शकते याला नाकारता येत नाही. कारण देशातील राजकीय प्रणालीने विद्यार्थ्यांच्या साधनांवर आणि आयुष्यावर घणाघाती प्रहार करून संपूर्ण तमाशा मांडला आहे. त्यामुळे नीट पेपर फुटी प्रकरणाच्या दरम्यान २२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. स्वतंत्र पुर्वकाळात युवा वर्ग देशाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी एकत्र झाला होता व आपल्या प्राणांची आहुती देऊन देश स्वतंत्र केला.परंतु आता स्वतंत्र भारताला पक्ष-विपक्षांच्या राजकारण्यांनी देशाला भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पोखरून टाकले असून अनेक गंभीर समस्या निर्माण केल्या आहेत.या भ्रष्ट व्यवस्थेपासुन देशाला मुक्ती मिळावी यासाठी जेन-झीचा उदय झाल्याचे दिसून येते.स्वतंत्र पुर्व काळात युवा पिढी स्वातंत्र्यासाठी लढले व आजचा युवा वर्ग आपल्या हक्कांसाठी लढत आहे.त्यामुळे जेन-झीचे वादळ आणि तुकारामांची सुनामी आता कोणीही रोखू शकत नाही. कारण जेन-झी सारखी तुकाराम मुंढे यांची आक्रमकता संपूर्ण देशभरात दिसायला लागली आहे.जंतरमंतरच्या आंदोलनाला विरोधकांचा साथ आणि झारखंडच्या आंदोलनाला एनडीएचा साथ असा भेदाभेद जेन-झी सोबत होत असल्याने आजचा युवा वर्ग सतर्क झाला आहे.कारण जेन-झीच्या लक्षात आले की,प्रत्येक पक्ष आपली राजकीय पोळी शेकण्याच्या तयारीत आहे.राजकीय पुढाऱ्यांनो लक्षात ठेवा आपल्या पुर्वजानी,थोर महात्मे, क्रांतिकारक अशा लाखो देशभक्तांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन देश स्वतंत्र केला. कारण त्यांचा एकच उद्देश होता की,भारत सुजलाम सुफलाम व्हावा व देशातील प्रत्येक नागरिकाला न्याय मिळावा.परंतु राजकीय पुढाऱ्यांनी सर्वत्र भ्रष्टाचाराचे बिज रोवले व त्यामुळे महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या,ढासळती शिक्षण प्रणाली, ढासळती आरोग्य सुविधा, करोडोंची दानचोरी,अन्नधान्य व दुग्धजन्य पदार्थामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ अशा अनेक गोष्टींना वाव देऊन देशाचे वाटोळे केले असून भ्रष्टाचाराच्या बाबतीत भारताला अव्वल स्थानावर राजकीय पुढाऱ्यांनी नेऊन ठेवले व आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने पैसा कमवून करोडपती झाल्याचे दिसून येते व सर्वसामान्यांना गरीबीच्या खाईत गुदमरत आहे.याला प्रत्युत्तर म्हणून जेन-झी चा जन्म झाल्याचे दिसून येते आणि याचे पडसाद देशभरात दिसत आहे व काही काळात प्रत्येक राज्यात दिसून येईल.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांनो सावधान आता तुमची खैर नाही. जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# शेतकरीहित केंद्रस्थानी ठेवून जलसंपदा विभागाला २०२९ पर्यंत आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याचे लक्ष्य : मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** जलसंपदा विभाग अधिक सक्षम, आधुनिक आणि लोककेंद्री करण्यासाठी २०२९ पर्यंत विभागांतर्गत महामंडळांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जलसंपदा विभागाचा केंद्रबिंदू शेतकरी आणि नागरिक असला पाहिजे. शेतीचे संरक्षण करतानाच शहरांची आणि उद्योगांची पाण्याची गरज भागविण्यासाठी शाश्वत जलनियोजन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २१व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील वरळी येथील एनएससीआय डोममधील 'द पॅलेस हॉल' येथे आयोजित परिसंवाद व कार्यशाळेच्या समारोप सत्रात ते बोलत होते. यावेळी जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्वेताली ठाकरे, प्राधिकरणाचे आजी-माजी सदस्य, जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच राज्यातील विविध जलविकास संस्थांचे अधिकारी उपस्थित होते.

जलसंपदा विभागासमोर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठेवलेल्या विकासाच्या आराखड्यानुसार काम करणे आवश्यक आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' चे उद्दिष्ट साध्य करताना शेती व्यवसायाला बाधा न आणता त्याचे संरक्षण करतच शहर आणि उद्योगांसाठी पाण्याचे नियोजन करावे लागेल, असे मंत्री विखे-पाटील यांनी स्पष्ट केले. सिंचनाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करणे, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे आणि उपलब्ध जलसंपत्तीचा शाश्वत वापर करणे ही जलसंपदा विभागाची प्रमुख जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

जलसंपदा विभागाने अनेक वर्षे मोठ्या प्रमाणावर काम केले असले, तरी या कामातून अपेक्षित सामाजिक परिणाम साध्य झाले का, याचेही मूल्यमापन आवश्यक आहे. सिंचन सुविधा निर्माण झाल्यानंतरही ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर कमी झाले का, शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान व नव्या पीकपद्धतींचा स्वीकार कितपत झाला, याचा विचार करण्याची गरज आहे. यासाठी जलसंपदा आणि कृषी विभागांमध्ये अधिक प्रभावी समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

**महामंडळांच्या आर्थिक स्वयंपूर्णतेवर भर**

जलसंपदा महामंडळांना दीर्घकाळ शासनाच्या निधीवर अवलंबून न ठेवता स्वतःचे आर्थिक स्रोत निर्माण करण्याची गरज आहे. गेल्या वर्षभरात धरणांच्या परिसरातील अतिक्रमणे हटवून सुमारे ५६ हजार एकर जमीन महामंडळांच्या नावे



करण्यात आली आहे. ही जमीन महामंडळांची महत्त्वाची आर्थिक मालमत्ता असून, तिचा सुयोग्य वापर करून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आर्थिक बळकटी निर्माण करता येईल, असे मंत्री विखे-पाटील यांनी सांगितले.

महामंडळांनी महसुलाचे विविध स्रोत निर्माण करावेत. पाणीपट्टीची वेळेत वसुली, पाणीगळती रोखणे आणि पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे मूल्य तसेच त्याच्या वापराचे उत्तरदायित्व निश्चित करणे आवश्यक आहे. जलवापरातून मिळणारा महसूल वाढल्यास नवीन सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करणे अधिक सुलभ होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. नद्या व कालव्यांचे प्रदूषण रोखण्याची जबाबदारी केवळ प्रदूषण नियंत्रण मंडळाची नसून जलसंपदा विभागाचीही आहे. वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर महानगरांमध्ये वापरलेल्या पाण्यापैकी किमान ८० टक्के पाण्याचा पुनर्वापर करण्याच्या दिशेने ठोस प्रयत्न आवश्यक आहेत. अनेक पाणीपुरवठा योजना नदीच्या पाण्यावर अवलंबून असताना जलप्रदूषण वाढत जाणे ही गंभीर बाब आहे, असेही मंत्री विखे-पाटील यांनी नमूद केले.

धरणांमध्ये उपलब्ध पाण्याचे प्रमाण लक्षात घेऊन पीक पद्धती व लागवडीचे नियोजन करण्यासाठी कृषी आणि जलसंपदा विभागांनी एकत्रितपणे काम करावे. उपलब्ध पाण्याच्या क्षमतेनुसार पिकांची निवड केल्यास शेती अधिक बागायती, उत्पादनक्षम आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

जलसंपदा विभागाने राज्याच्या हितासाठी पर्यटन आणि फ्लोटिंग सोलर यांसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. या माध्यमातून विभागाच्या मालमत्तेचा आणि जलसाठ्यांचा बहुउद्देशीय वापर करताना त्यातून निर्माण होणारे आर्थिक स्रोत जलप्रकल्पांच्या विकासासाठी उपयोगात आणण्याचे प्रयत्न व्हावेत, असे आवाहन त्यांनी केले.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे काम अत्यंत संवेदनशील असून, प्राधिकरणाने घेतलेल्या प्रत्येक निर्णयाचा व्यापक सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय परिणाम लक्षात घेणे आवश्यक आहे.'कोणाला काय वाटते' यापेक्षा निर्णयाची व्याप्ती, त्याचे संभाव्य परिणाम आणि क्षेत्रीय वास्तव लक्षात घेऊन काम झाले पाहिजे, असे मंत्री विखे-पाटील यांनी स्पष्ट केले.

जलक्षेत्रातील स्थानिक समस्या आणि क्षेत्रीय विषमता समजून घेण्यासाठी नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर यांसह राज्यातील विविध भागांत प्रादेशिक कार्यशाळा आयोजित करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. अशा कार्यशाळांमधून शेतकरी, अधिकारी आणि संबंधित घटकांचे प्रश्न प्रत्यक्ष जाणून घेऊन स्थानिक गरजांनुसार उपाययोजना करणे शक्य होईल, असे त्यांनी सांगितले.

जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी राज्याच्या वाढत्या जलआव्हानांच्या पार्श्वभूमीवर जलसंपत्तीचे नियोजन, वितरण आणि नियमन अधिक प्रभावी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, पारदर्शक कार्यपद्धती आणि विविध यंत्रणांमधील समन्वय आवश्यक असल्याचे सांगितले.

जलसंपत्तीचे न्याय्य, समतोल आणि शाश्वत व्यवस्थापन हे राज्याच्या भविष्यातील विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. शेती, उद्योग, नागरी भाग आणि पर्यावरणीय गरजा यांच्यात समतोल राखण्यासाठी दीर्घकालीन नियोजन आवश्यक आहे. जलवाटपाच्या निर्णयप्रक्रियेत विश्वासार्ह माहिती, जलवापर कार्यक्षमता आणि स्थानिक गरजा यांचा विचार करून नियमन अधिक संवेदनशील, वस्तुनिष्ठ व लोकाभिमुख करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, सिंचन अनुशेष मोजण्यासाठी वैज्ञानिक व पारदर्शक कार्यपद्धती, पाणी वापर कार्यक्षमता, निधीचे योग्य नियोजन आणि प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या उपाययोजनांवरही परिसंवादात सविस्तर चर्चा झाली. राज्यातील एकूण सिंचन अनुशेषापैकी ९७.९० टक्के अनुशेष दूर करण्यात आला असून, उर्वरित अनुशेषही निर्धारित कालमर्यादेत दूर करण्यासाठी नियोजन करण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमात जलसंपदा विभागाच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या राज्यातील निवडक आजी-माजी अधिकाऱ्यांचा मंत्री विखे-पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे सदस्य (भूजल) डॉ. प्रभात कुमार जैन यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

पान १ वरून

## मोडकळीस आलेल्या शाळा...

करण्याचे मत महानगरपालिकेने व्यक्त केले होते.

या संदर्भात संबंधित शाळेच्या संस्थेने शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. मात्र, हा प्रस्ताव बराच काळ प्रलंबित राहिल्याने शाळेचे स्थलांतर होऊ शकले नव्हते. त्यामुळे संबंधित शाळेसाठी अन्यत्र उपलब्ध असलेल्या जागेवर स्थलांतराची परवानगी मिळावी, यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती.

या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने शाळेच्या इमारतीची स्थिती आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गांभीयार्ने घेतला. दिनांक ५ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच सोलापूर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी ऑनलाइन व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे न्यायालयासमोर हजर होते.

सुनावणीनंतर उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठातील न्यायमूर्ती मिलिंद एन. जाधव आणि न्यायमूर्ती नंदेश एस. देशपांडे यांनी संबंधित प्रशासनाला शाळेच्या स्थलांतराबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच विद्यार्थ्यांच्या तसेच कार्यरत शिक्षकांच्या जीवितास कोणताही धोका किंवा हानी होणार नाही, याची दक्षता घेण्याची ग्वाही प्रशासनाकडून न्यायालयाला देण्यात आली.

न्यायालयाच्या निदेर्शानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी तत्परता दाखवत मोडकळीस आलेल्या इमारतीत सुरू असलेल्या शाळेच्या विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू करण्यास सहमती दर्शविली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या शाळा स्थलांतराच्या प्रश्नाला आता गती मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, अक्कलकोट तालुक्यातील बबलाद येथील शाळेच्या इमारतीचा काही भाग कोसळून १३ विद्यार्थी व दोन शिक्षक जखमी झाल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणाचे गांभीर्य अधिक अधोरेखित झाले आहे. शाळांच्या धोकादायक इमारतींबाबत प्रशासनाने वेळीच उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे या घटनेतून पुन्हा स्पष्ट झाले आहे.

आदर्श विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न न्यायालयीन पातळीवर मांडून त्यासाठी तातडीने कार्यवाही होण्यास मार्ग मोकळा झाल्याने पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. या प्रकरणात ॲडव्होकेट विश्वासराव देवकर आणि ॲडव्होकेट सौ. रंजना देवकर यांनी काम पाहिले.

# मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणात ७७.९७% गणना प्रपत्र प्राप्त

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण सुरू असून, घरोघरी भेट देऊन गणना प्रपत्र भरून घेण्याची मुदत १७ ऑगस्ट २०२६ रोजी संपत आहे. राज्यातील एकूण ९ कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ मतदारांपैकी आतापर्यंत ७ कोटी ६२ लाख ९९ हजार ३६० (७७.९७ टक्के) मतदारांचे गणना प्रपत्र भरून व स्वाक्षरीसह प्राप्त झाले आहे.

गृहभेटीनंतर १ कोटी ८७ लाख ५६ हजार २३१ (१९.१७ टक्के) मतदार 'गणना प्रपत्र जमा न होण' या प्रवर्गात नोंदविण्यात आले आहेत. यामध्ये सापडू न शकलेले किंवा गैरहजर ६३ लाख ६१ हजार ११३, कायमस्वरूपी स्थलांतरित ७१ लाख ९५ हजार ३८८, मृत ३३ लाख ९४ हजार ५३, अन्यत्र नोंदणी केलेले अथवा दुबार १६ लाख ६२ हजार १२१ आणि इतर प्रवर्गातील १ लाख ४३ हजार ५५६ मतदारांचा समावेश आहे. एकूण मतदारांपैकी ९ कोटी ५० लाख ५५ हजार ५९१ (९७.१४ टक्के) मतदारांबाबतची कार्यवाही पूर्ण झाली असून, २७ लाख ९८ हजार ४५८ (२.८६ टक्के) मतदारांबाबतची कार्यवाही अद्याप बाकी आहे. 'गणना प्रपत्र जमा न होणे' प्रवर्गातील मतदारांच्या नावांच्या याद्या संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकृत संकेतस्थळांवर या याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत किंवा प्रसिद्ध करण्याची कार्यवाही सुरू आहे.

या याद्यांमध्ये नाव असलेल्या मतदारांच्या वास्तव्याबाबत मतदार किंवा बीएलए यांनी संबंधित बीएलओ यांना माहिती दिल्यास प्रत्यक्ष पडताळणी करून त्यांचे गणना प्रपत्र १७ ऑगस्टपर्यंत भरून घेता येणार आहे. याबाबत सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना १२ ऑगस्ट रोजी झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत सविस्तर माहिती देण्यात आली असून, संबंधित बीएलए यांनी याद्यांची तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

# 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' उपक्रमात सहभागी होण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा - मंत्री संजय राठोड

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने २१ ऑगस्ट रोजी राज्यभर जलसंधारण दिन साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने राज्यव्यापी 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर', जलसंधारणाची शपथ, युवकांसाठी लघुचित्रफीत स्पर्धा, तसेच शाळा-महाविद्यालयांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' मध्ये सहभागी होण्यासाठी क्यूआर कोडच्या माध्यमातून ऑनलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी क्यूआर कोड स्कॅन करून या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले आहे.

मंत्री संजय राठोड म्हणाले, 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'मध्ये सहभागी होण्यासाठी क्यूआर-आधारित ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. २१ ऑगस्ट रोजी होणाऱ्या महा वॉकेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ई-प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या प्रसिद्धीसाठी मीडियाने या हॅशटॅगचा वापर करावा. १५ ते २१ ऑगस्टदरम्यान जलसंधारण सप्ताह, तसेच त्यानंतर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत जलसंधारण अभियान राबविण्यात येणार आहे.

१५ ते २१ ऑगस्ट २०२६ या जलसंधारण सप्ताहादरम्यान राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये मृद व जलसंधारण विषयावर 'रील्स स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींच्या कल्पकतेचा उपयोग करून इन्स्टाग्रामच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी राज्यव्यापी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

### वात्रटिका

**सुनावणी**

मशाल तळपत विचारते
धनुष्यबाण आहे कोणाचा....
दोरी थोडी ढिल्ली झाली नि
ताण कमी झाला बाणाचा...
तिकडे तुतारी पोहचली
उगाच दुसऱ्याच्याच दारी...
पहात राहिले आणि बोलते
झाले बिगर कामाचे कारभारी...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# गुणवंत विद्यार्थी हेच समाजाचे भूषण : रामप्पा चिवडशेट्टी



**सोलापूर (कटूसत्य वृत्तसेवा) :** तरुण पिढीचे भवितव्य हे त्यांच्यावर झालेल्या संस्कारांचे फलित असते. देश, देव आणि समाजाप्रती जाणीव ठेवून कार्य केल्यास समाजाची प्रगती साध्य होते. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच समाजाचे ऋण फेडण्याची भावना मनात ठेवावी, असे आवाहन सोलापूर जिल्हा परिषद कृषी समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांनी केले.

वीरशैव सेवा मंडळ पूर्व विभाग, सोलापूर यांच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

चिवडशेट्टी म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाजाच्या उन्नतीसाठीही करावा. संस्कार, शिक्षण आणि सामाजिक जाणीव यांचा समन्वय साधणारी तरुण पिढीच सक्षम समाजाची निर्मिती करू शकते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रभाकर हंगे यांनी केले. यावेळी नगरसेवक शिवानंद पाटील आणि भाजपा युवा आघाडीचे अध्यक्ष महेश बिराजदार यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास काशिनाथ रुगे, संगमेश्वर पायमल्ले, सुरेश चिक्कळी, विजयकुमार हुल्ले, शंकर पावरगी, विश्वनाथ मेरकर, राजशेखर मळेवाडी, वसंतराव परांडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# दादपूरच्या अंगणवाडी इमारतीसाठी ११.५० लाखांचा निधी मंजूर






**कुरुल (कटूसत्य वृत्त) :** सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दादपूर येथे अंगणवाडी इमारत बांधकामासाठी ११ लाख ५० हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या विकासकामाचा भूमिपूजन सोहळा कामती पंचायत समिती सदस्य कोमल अंकुश आवताडे आणि ग्रामसेवक उज्वला उमाटे यांच्या हस्ते पार पडला.

दादपूर गावातील बालकांना अंगणवाडीच्या माध्यमातून चांगल्या सुविधा मिळाव्यात, तसेच त्यांच्या शिक्षण, आरोग्य आणि संगोपनासाठी सुसज्ज इमारत उपलब्ध व्हावी, यासाठी पंचायत समिती सदस्य कोमल आवताडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अंगणवाडी इमारत बांधकामासाठी ११ लाख ५० हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

या भूमिपूजन कार्यक्रमास प्रशासकीय सरपंच बबन कांबळे, मार्गदर्शक अण्णा सुरवसे, उपसरपंच सुनील पवार, प्रकाश आवताडे, मसुदेव आवताडे, समाधान आवताडे, दादासाहेब मिसाळ, सचिन आवताडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे आणि भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली दादपूर गावच्या विकासाला प्राधान्य देण्यात येत असल्याचे मोहोळ तालुका भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष अंकुश आवताडे यांनी सांगितले.

'येत्या काळात गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारी सर्व मदत उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विविध विकासकामांना मंजुरी मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करणार आहे,' असेही त्यांनी सांगितले.

# जि.प.मुले नं.४ शाळेत पतंग निर्मिती कार्यशाळा संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील जिल्हा परिषद प्राथमिक मुले नं.४ शाळेत नागपंचमी सणानिमित्त पतंग निर्मिती ची कार्यशाळा घेण्यात आली.

नागपंचमी हा हिंदू धमार्तील महत्त्वाचा सण असून हा सण श्रावण महिन्याच्या शुक्ल पक्ष पंचमीला साजरा केला जातो. यादिवशी नागाची पूजा केली जाते.भारतीय संस्कृतीत सापांविषयी आदर आणि निसर्गात त्यांच्या महत्त्वाची जाणीव या सणातून व्यक्त होते.महाराष्ट्रात धार्मिक पारंपारिक खेळ मुली व महिला खेळतात.तर मुले व पुरुष मंडळी मोकळ्या आकाशात रंगीबेरंगी पतंग उडविण्याचा आनंद घेतात.उत्साह आणि सर्जनशीलतेचा अनुभव पाहायला मिळतो.

पतंग उडवताना सुरक्षित साधा दोरा वापरणे.रस्ता व वीजेच्या तारांपासून दूर राहणे मोठ्या माणसांच्या देखरेखीखाली पतंग उडवणे महत्वाचे आहे.पक्षांना इजा होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे.परंपरा जपूया.. निसगार्चे रक्षण करुया.. आणि सण आनंदाने सुरक्षितपणे साजरा करुयात असा संदेश शाळेच्या वतीने मुख्याध्यापक सतीश जाधव यांनी दिला.यावेळी पतंग निर्मितीचे प्रात्यक्षिक नितीन बनकर यांनी दिले.स्वनिर्मितीचा वेगळाच आनंद विद्यार्थ्यांचा चेहऱ्यावर दिसून आला.

# आमदार राजेंद्र राऊत यांचा सपत्नीक सत्कार; 'मराठा भूषण' पदवीने गौरव

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** विधान परिषद सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विजयी झाल्याबद्दल आमदार राजेंद्र राऊत आणि त्यांच्या पत्नी कविता राऊत यांचा सकल मराठा समाज, बार्शी यांच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील आणि ह.भ.प. डॉ. जयवंत बोधले महाराज यांच्या हस्ते हा सत्कार सोहळा पार पडला.

यावेळी नरेंद्र पाटील यांनी आ. राजेंद्र राऊत हे मराठा समाजाचे खरे भूषण असल्याचे सांगितले. विधान परिषद निवडणुकीत भरघोस मतांनी मिळालेला विजय हा त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याची पावती असल्याचे त्यांनी नमूद केले.

ह.भ.प. डॉ. जयवंत बोधले महाराज यांनी संत आणि समाजाच्या आशीर्वादामुळे राजेंद्र राऊत यांना मोठा विजय मिळाल्याचे सांगितले. समाजासाठी काम करताना राजकारणाकडे समाजसेवेच्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.



सत्काराला उत्तर देताना आमदार राजेंद्र राऊत म्हणाले, 'मराठा समाजाने मला 'मराठा भूषण' ही पदवी देऊन मोठे केले आहे. समाजाने माझ्यावर दाखविलेला विश्वास आणि प्रेम मी कधीही विसरणार नाही. समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सदैव प्रामाणिकपणे प्रयत्नशील राहीन.' राजकारण हे समाजसेवेचे माध्यम असून, मिळालेली जबाबदारी जनतेच्या हितासाठी पार पाडणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या सत्कार सोहळ्यास डॉ. बी. वाय. यादव, दास शेळके, सुनील रसाळे, सुनील मोरे, दिलीप कोल्हे, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, संतोष निंबाळकर, विजय गरड, रोहित पाटील, अरुण बारबोले, मंगल शेळवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

# मनोरमा बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा १५ ऑगस्टला

## पालकमंत्र्यांच्या हस्ते आ. राऊत यांचा होणार सत्कार

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मनोरमा को-ऑप. बँकेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता हॉटेल बालाजी सरोवर येथे आयोजित करण्यात आली असल्याची माहिती अध्यक्ष श्रीकांत मोरे यांनी दिली. या सभेत विधान परिषदेवर नुकतेच निवडून आलेले आमदार राजेंद्र राऊत यांचा मनोरमा परिवाराच्या वतीने पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या वेळी आमदार सुभाष देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, माजी आमदार दिलीप माने, भाजपचे प्रदेश सदस्य विक्रम देशमुख,बार असोसिएशनचे अध्यक्ष एडवोकेट संतोष पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**बँकेचा मिश्र व्यवसाय १,०६६ कोटींवर**

मनोरमा को-ऑप. बँकेची स्थापना ९ मे १९९७ रोजी संस्थापक चेअरमन कै. सदाशिवराव मोरे यांनी केली. गेल्या २९ वर्षांच्या वाटचालीत बँकेने मुख्य कार्यालयासह एकूण ११ शाखांचा विस्तार केला असून, नुकतीच अंत्रोळीकर नगर, सोलापूर येथे नवीन शाखा सुरू करण्यात आली आहे. ३१ मार्च २०२६ अखेर बँकेचा मिश्र व्यवसाय १,०६६.६७ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. बँकेच्या ठेवी ६३४.४४ कोटी रुपये, कर्जे ४३२.२३ कोटी रुपये, गुंतवणूक २०७.२० कोटी रुपये असून वसूल भागभांडवल १७.१५ कोटी रुपये आहे. राखीव व इतर निधी १८.४५ कोटी रुपये असून आर्थिक वर्षअखेर बँकेला आयकरासह ५.२० कोटी रुपयांचा नफा झाला आहे. बँकेचा लेखापरीक्षण वर्ग 'अ' आहे. विशेष म्हणजे गेल्या आठ वर्षांपासून बँकेचा एनपीए शून्य टक्के असल्याचे बँकेचे अध्यक्ष श्रीकांत मोरे यांनी सांगितले

**तीन वेळा मिळाला आदर्श बँक पुरस्कार**

सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनकडून मनोरमा को-ऑप. बँकेला आतापर्यंत तीन वेळा 'आदर्श बँक पुरस्कार' मिळाला आहे.

**महिला, शेतकरी आणि लघुउद्योगांना अर्थसहाय्य**

मनोरमा बँक परिवाराने सोलापूर जिल्ह्याच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रात सातत्याने योगदान दिले आहे. महिला लघुउद्योग, महिला बचत गट, ग्रामीण शेतकरी, दुग्ध व्यवसाय तसेच कुटीर उद्योगांना अर्थसहाय्य देत बँकेने सामाजिक बांधिलकी जपली असल्याचे बँकेने म्हटले आहे. बँकेचे कार्यक्षेत्र सोलापूर, पुणे, धाराशिव आणि सांगली जिल्ह्यांपर्यंत असून, सोलापूर शहर व जिल्ह्याच्या आर्थिक विकासात बँकेचे योगदान राहिले आहे. बँक २९ वर्षे पूर्ण करून ३० व्या वर्षात पदार्पण करीत आहे.

## चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग सोलापूर**
**ब.अ.नं.१०४२/२०२६ कि.अ.क्र.१०४३/२०२६**

संस्थेचे नांव :- कपिल शिक्षण प्रसारक मंडळ व समाजसेवा बक्षीहिप्परगे ता दक्षिण सोलापूर.
न्यास नों.क्र. :- एफ -४२१५ /सोलापूर
अर्जदार -श्री विश्रांत नारायण गायकवाड
विरूध्द :- कोणी नाही-गैरअर्जदार

सदरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ व सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० चे कलम १२-अ अन्वये संस्थेच्या नांवात पत्यात व घटना नियमावलीत बदल करून मिळणेसाठी अर्ज मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त साहेब यांच्या कार्यालयात दाखल केलेले आहे. या नोटीसीध्दारे कळविण्यात येते की. या न्यासाचे आपले काही संबंध असल्यास अथवा काही हरकत /तक्रार नोंद करायची असल्यास आपण स्वत: किंवा वकिलामार्फत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आपली हरकत लेखी स्वरूपात दाखल करावी ३० दिवसानंतर आपले कुठलेही प्रकारच्या हरकतीचा व कुठल्याही बाबींचा विचार केला जाणार नाही. आणि एकतर्फा हुकुम करून सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी . ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे शिक्यानिशी दि. १०/०८/२०२६ दिली आहे.

(शिक्का)
अधिक्षक
सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय
सोलापूर विभाग सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्रि. कि. अर्ज नं. /२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**

सौ.धोंडुबाई महादेव कांबळे (लग्नानंतरचे नांव) धोंडूबाई ज्ञानोबा व्यवहारे (लग्नापुर्वीचे नांव) वय-६० वर्षे, धंदा- घरकाम, रा. घर नं. ०३४७, भारत स्टोर जवळ, गावदेवी वाडी नवी मुंबई घणसोली, मुंबई ४००७०१ } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाळुज, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी त्यांचा जन्म ता. ०१/०६/१९६५ रोजी मौजे वाळुज, ता.मोहोळ येथे झालेला आहे. परंतु त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत वाळुज, ता. मोहोळ, जि. सोलापूर ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांनी त्यांची जन्माची नोंद ग्रामपंचायत वाळुज, यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता. १४/०८/२०२६

(शिक्का)
हुकूमावरुन
**मा.तहसिलदार सो, मोहोळ**

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्रि. कि. अर्ज नं. /२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**

सिध्देश्वर सौदागर यादव,वय ५८ वर्षे,धंदा-शेती रा. डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरूद्ध**

निबंधक,जन्म, मृत्यु, विवाह नोंदणी कार्यालय, डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर } **सामनेवाला**
(अर्जाची नोटीस निबंधक,जन्म, मृत्यु, विवाह नोंदणी कार्यालय,डिकसळ, यांचेवर बजावविण्यात यावी.)

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडिल सौदागर सोमा यादव यांचा दि. १५/०३/२००३ रोजी मौजे डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे राहत्या घरी मृत्यु झाला असलेने अर्जदार हा त्यांचा मुलगा असुन अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे मयत सौदागर सोमा यादव यांच्या मृत्यु दाखल्याची ता. २३/०३/२०२६ रोजी मागणी केलेली होती, परंतु सदर निबंधक, जन्म, मृत्यु व विवाह नोंदणी कार्यालय डिकसळ, ता. मोहोळ यांनी त्यांच्या अभिलेखात २००३ सालचे संपुर्ण अभिलेख तपासले असता अर्जदार यांचे वडिल सौदागर सोमा यादव यांच्या मृत्युची नोंद नमुद नसल्याचे दिसुन आलेले असुन त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे.कोर्टात निबंधक, जन्म, मृत्यु व विवाह नोंदणी कार्यालय डिकसळ, ता.मोहोळ चे मृत्यु रजिस्टरला नोंद घेवुन अर्जदार यांना तसे मृत्यु प्रमाणपत्र देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करणेबाबत अर्ज केला आहे. याबाबत कोणाची हरकत, आक्षेप असल्यास १५ (पंधरा) दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावेत. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे मृत्युचा दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता.१४/०८/२०२६.

(शिक्का)
हुकूमावरुन
**मा.तहसिलदार सो, मोहोळ**

## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**
**ई-निविदा सुचना क्रमांक १४ सन २०२६-२७ (ऑनलाईन)**
**"बी-१ निविदा"**

संदर्भ:- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रं.संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२/मंत्रालय मुंबई-०३२ दि. १४/०२/२०२५

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पुर्ण करीत व सा.बां. विभगाकडून नोंदणीकृत असलेल्या व नमूद केलेल्या कंत्राटदाराकडून खालीली कामा करिता ''बी-१'' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे(ऑनलाईन)मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक विभाग. सोलापुर, ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाज पत्रकीय रक्कम रु. | ठेकेदाराचा अधीकृत वर्ग |
|---|---|---|---|---|
| १. | 1.Construction of Sabhamandap at Purv Mangalwar Peth, Mahadev Galli Shri Datta Swami Samarth Mandir in S.M.C.Land at Solapur, 2. Construction of Samaj Mandir at Prabhag No.7 in premises of Balaji Mandir in S.M.C. Land at Solapur 3.Construction of Internal B.T.Road at Prabhag No.4 Samrat Chowk Mohare House to Nilkant Bank at S.M.C. Land Solapur Tal.North Solapur Dist. Solapur | बी-१ निविदा | ८४,१८,६३७/- | वर्ग-४ (अ) व त्यावरील |
| २. | 1. Construction of Sabhamandap & Sushobhikaran at Samrat Chowk Budhwar Peth Shri Mata Bhagwati Mandir Solapur 2.Construction of Sabhamandap at Gandhi Nagar No.3 Hanuman Mandir Solapur 3.Construction of Sabhamandap at Solapur City North Vadar Galli Solapur 4.Construction of Compound Wall. Sushobhikaran & Sabhamandap at Vighnaharta Sanskritika Ganesh Utsav Mandal Bahuuddeshiya Sanstha Avanti Nagar Murarji Peth Solapur Vir Ganpati Mandir Temple Renovation at Solapur 5.Construction of Sabhamandap at Solapur North 117 Muraraji Peth Mahalaxmi Mandir Solapur Tal.North Solapur Dist.Solapur | बी-१ निविदा | ६७,६६,१३८/- | वर्ग-४ (अ) व त्यावरील |
| ३. | Construction of Parking shed and Renovation of Rural Hospital Builidng Building at Akkalkot. Tal- Akkalkot. Dist. Solapur. | बी-१ निविदा | ५०,०४,९२९/- | वर्ग-४ (अ) व त्यावरील |

| | |
|---|---|
| निविदा उपलब्ध कालावधी | दि.१४/०८/२०२६ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते २१/०८/२०२६ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक. | दि.२१/०८/२०२६ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| मुळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा:- शर्त ८.१) | ई-निविदा पोर्टलवर ''बीड लॉक'' झाल्यानंतर ७२ तासात ''हार्ड कॉपी १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. १.मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ. | दि.२४/०८/२०२६ मा.कार्यकारीअभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
१) www.mahapwd.gov.in २) www.mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३)कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक
(डीजीआयपीआर-२०२६-२७/क्र-५/सी२२७२)

**सही/- (डी.डी. परदेशी)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**


# Classified - छोटी जाहीरात

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नभ, गगन २) पाहुणे ३) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा ४) लहान बाळाला ही टोचतात ५) भारतात सर्वाधिक साक्षरता असलेले राज्य ६) एअरफोर्स (मराठीत) ७) त्वरेने, पटकन १२) न्यूझिलंडचा एक फलंदाज १४) सेनापती १५) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना १६) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत १७) खलनायक (इंग्रजीत) २१) देवाला घातलेले साकडे २२) नाहक त्रास करून घेणे २३) २६/११ च्या हल्ल्यातील दहशतवादी २४) महाराष्ट्राचे काँग्रेस आघाडी सरकारचे एक माजी मुख्यमंत्री २६) कृषी विद्यापीठ असलेले कोकणातील ठिकाण ३१) पाच दुणे ३४) लाकूड कापण्याचे साधन ३५) फळ (हिंदीत) ३६) समुद्राच्या पाण्यात असणारा एक प्राणीजीव ३७) एक म्हण- गाव करील ते ** काय करील ३८) चव ओळखणारी जिव्हा ४०) यशाचे गुपित, सूत्र ४१) परिवर्तन ४४) फळातील गोड द्रव ४५) चार आणि तीन मिळून होणारी संख्या ४७) सज्जन, प्रामाणिक

**आडवे शब्द :** १) भारतातील टी-२० क्रिकेट स्पर्धेचे नाव ५) दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे आडनाव ८) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच ९) सत्वयुक्त, कस असलेले १०) तरूण ११) एक जुने हिंदी गीत- ** है सुहाना, वातावरण (हिंदीत) १२) पाण्यात विहरणारा एक पांढऱ्या रंगाचा पक्षी १३) एखाद्या गोष्टीचे लागलेली वाईट सवय १६) महायुध्दाच्या काळातील जर्मनीचा हुकूमशहा १८) अश्व जोडलेले क्षत्रियाचे वाहन १९) किंमती वस्तू २०) चहा (इंग्रजीत) २१) आश्चर्य २३) रंग (इंग्रजीत) २५) वतनाचा मालक २७) दुधावरील मलई २८) आयपीएल टी-२० क्रिकेट सामन्यातील एक युवा भारतीय फलंदाज-** शॉ २९) वस उलट लिहा ३०) देव, ईश्वर (हिंदीत) ३२) सीतापती ३३) त्रास (हिंदीत) ३६) राजाला दिली जाणारी उपाधी ३९) घाई, गडबड ४२) आश्वासन, दिलेला शब्द ४३) विश्वास ४६) मुस्लिम धर्माची शिक्षण देणारी शाळा ४८) नेहमी ४९) उद्या (हिंदीत) ५०) तिखट न टाकलेले डाळीचे कालवण

## सुडोकु - 29

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | | | 2 | 8 | | | | |
| | 4 | | | 9 | | | | 8 |
| | 3 | 8 | | 5 | 7 | 4 | 9 | |
| | | | 6 | 7 | 2 | | 3 | |
| | 1 | | 5 | 4 | | | | |
| | 5 | | 8 | 3 | | 6 | | |
| 8 | | | | 1 | | 9 | 6 | 2 |
| | | 4 | 7 | 6 | | 1 | | 5 |
| | 6 | 5 | 9 | | | 3 | | 4 |

# शंकरनगर येथे दि. १६ व १७ रोजी महिलांसाठी भव्य नागपंचमी सण सोहळ्याचे आयोजन

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाशिवरात्र यात्रा महोत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर यांच्यावतीने महिलांसाठी पारंपारिक खेळ व संस्कृती जोपासणारा भव्य नागपंचमी सण सोहळा रविवार दिनांक १६ व सोमवार दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ४ ते ८ या वेळेत शिवपार्वती मंदिर शंकरनगर येथे आयोजित केला आहे.



महाशिवरात्र महोत्सव समितीचे अध्यक्ष, ग्रामीण संस्कृतीचे जोपासक व या सोहळ्याचे आयोजक जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील, अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक युवा नेते सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या नियोजनातून हा महिलांसाठीचा नागपंचमी सण सोहळा भव्य प्रमाणावर साजरा होणार आहे

श्रावण महिन्यात ग्रामीण संस्कृतीचे व सणावारांचे महत्त्व आहे. या महिन्यात माय माऊली भगिनी मोठ्या आनंदाने विविध सण साजरे करतात. हे सण साजरे करीत असताना नागपंचमीचा झोका, फेर, फुगडी, पिंगा, काटवटकणा असे विविध पारंपारिक खेळ त्यांच्या आनंदाला उधाण आणीत होते. याच जगरहाटीत लोप पावत चाललेले खेळ व आनंद पुनर्प्रस्थापित करून आपल्या समृद्ध परंपरांचा वारसा एकत्र येऊन जोपासण्यासाठी या नागपंचमी सण सोहळ्याचे आयोजन केले आहे. पारंपारिक मूल्यांचे जतन व्हावे यासाठी जयसिंह मोहिते पाटील यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले आहे.

आधुनिक तंत्रज्ञाच्या काळात मोबाईल, टी.व्ही. आदीमुळे ही परंपरा लोप पावत चालली असल्याच्या पार्श्वभूमीवर महाशिवरात्र यात्रा समितीने सन २०२४ मध्ये महिलांसाठी आयोजित केलेल्या श्रावणी सोहळ्यात सुमारे १० ते १२ हजार महिलांनी व सन २०२५ मध्ये आयोजित केलेल्या नागपंचमी सण सोळ्यात सुमारे २२ ते २५ हजार महिलांनी पारंपारिक वेशभूषेत सहभागी होऊन पारंपारिक खेळाचा आनंद लुटला होता. यावर्षी देखील महिलांचा हाच आनंद द्विगुणीत व्हावा याकरिता शिवपार्वती मंदिर परिसरात २८ हजार स्केअर फुटाचा वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात आला आहे. तर महिलांसाठी अल्प दरात विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्सही उपलब्ध करून दिले आहेत. महिलांनी याचा लाभ घेण्याचे अवाहनही आयोजकांनी केले आहे.

# उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय व ग्रंथमित्र पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयामार्फत राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, नागरिकांना दर्जेदार ग्रंथालयीन सेवा उपलब्ध व्हाव्यात आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने "डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार" तसेच "डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक – ग्रंथमित्र पुरस्कार" देण्यात येतात. राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे रु. 1 लाख, रु. 75 हजार, रु. 50 हजार आणि रु. 25 हजार अशी रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येणार आहे.

तसेच राज्यस्तरावर एक उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता आणि एक उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी रु. 50 हजार रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व ग्रंथभेट दिली जाणार आहे. याशिवाय प्रत्येक महसुली विभागातील एका उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्त्यास व एका उत्कृष्ट ग्रंथालय सेवकास प्रत्येकी रु. 25 हजार रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात येईल.

सन 2025–26 या वषार्सांठी पुरस्कारासाठी इच्छुक असलेल्या ग्रंथालयांनी तसेच ग्रंथालय कार्यकर्ते व सेवक – ग्रंथमित्र यांनी विहित नमुन्यातील प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह तीन प्रतींमध्ये 25 सप्टेंबर 2026 पर्यंत आपल्या जिल्ह्यातील /जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत. पुरस्कारासाठी पात्र असलेल्या ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवकांनी विहित मुदतीत प्रस्ताव सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# 'रॅपिडो'वर आरटीओ अन् वाहतूक पोलिसांची कारवाई

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर वाहतूक शाखा आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी संयुक्तपणे धडक कारवाई करत एसटी स्थानक परिसरातून 'रॅपिडो' ॲपद्वारे अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या ११ दुचाकींवर कारवाई केली आहे. या कारवाईत एका वाहनाला १० हजार रुपयांपेक्षा जास्त दंड ठोठावण्यात आला आहे.

महाराष्ट्र सरकारचे आवश्यक नियम आणि अटी पूर्ण न केल्यामुळे राज्यात रॅपिडो सेवा अवैध मानली जाते. तरीही अनेक तरुण या ॲपवर आपल्या दुचाकी नोंदवून प्रवासी वाहतूक करत असल्याचे समोर आले आहे.

**११ दुचाकींवर १० हजारांहून अधिक दंड!**



**तरुणांनी रॅपिडोवर नोंदणी करू नये: पोलीस निरीक्षक विजय खोमणे**

"रॅपिडो ॲपवरून बाईकद्वारे प्रवासी वाहतूक करणे बेकायदेशीर आहे. तरुणांनी आर्थिक फायद्यासाठी या ॲपवर आपल्या गाड्या रजिस्टर करू नयेत. यामुळे मोठे आर्थिक नुकसान आणि कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते. आरटीओ व वाहतूक शाखेतर्फे सर्व दुचाकीधारकांना सजग राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे."
– **विजय खोमणे** (पोलीस निरीक्षक, शहर वाहतूक नियंत्रण शाखा, सोलापूर)

**इतर राज्यांत परवानगी, महाराष्ट्रात अवैध!**

आर.टी.ओ. कडून मिळालेल्या माहितीनुसार, 'रॅपिडो' सेवा इतर काही राज्यांमध्ये अधिकृत असली, तरी महाराष्ट्रात या सेवेला अद्याप परवानगी दिलेली नाही. रॅपिडो कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या वाहतूक नियमावलीतील अटी व शर्तींची पूर्तता केलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रात या ॲपद्वारे दुचाकीवरून प्रवासी वाहतूक करणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे.

**नागरिक आणि दुचाकीधारकांसाठी महत्त्वाचे**

» **दंडात्मक कारवाई:** नियमबाह्य प्रवासी वाहतूक करताना आढळल्यास १० हजार रुपये किंवा त्याहून अधिक दंडाची तरतूद आहे.
» **सुरक्षिततेचा प्रश्न:** अनधिकृत वाहतुकीमुळे अपघाताच्या वेळी विम्यासंदर्भात मोठे प्रश्न निर्माण होऊ शकतात.
» **कारवाई सुरूच राहणार:** एसटी स्टँड, रेल्वे स्टेशन व गर्दीच्या ठिकाणी अशी दंडात्मक कारवाई पुढेही तीव्र केली जाणार आहे.

# मोहोळ तालुक्यातील १,७१९ शेतकऱ्यांना १९ कोटी ७७ लाखांची कर्जमाफी

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत मोहोळ तालुक्यातील १,७१९ शेतकऱ्यांना तब्बल १९ कोटी ७७ लाख २६ हजार रुपयांची कर्जमाफी जाहीर झाली आहे. कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी तातडीने बँक खात्याची केवायसी करून घेण्याचे आवाहन मोहोळ येथील सहकार विभागाचे सहाय्यक निबंधक जी. टी. वडेकर यांनी केले आहे. ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांचा या कर्जमाफी योजनेत समावेश करण्यात आला असून, पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी मिळणार आहे.

तालुक्यात सर्वाधिक लाभार्थी बँक ऑफ इंडियाचे ४६४ असून, सर्वात कमी लाभार्थी आयसीआयसीआय बँकेचा केवळ एक शेतकरी आहे. लाभार्थी शेतकऱ्यांचे १०० टक्के आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्यासाठी सहकार विभागाने तालुक्यात सहा पालक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. हे अधिकारी विविध बँका तसेच महा-ई-सेवा केंद्रांना भेटी देऊन आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत. शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालयासमोर मोठे डिजिटल फलकही लावण्यात आले आहेत.

दरम्यान, कर्जमाफी जाहीर झाली असली तरी प्रत्यक्ष रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर कधी जमा होणार, याकडे लाभार्थी शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक झाल्यानंतर कर्जमाफीची रक्कम खात्यावर वर्ग होण्यास सुरुवात झाली असल्याचे वडेकर यांनी सांगितले. 'कर्जमाफीची रक्कम खात्यावर जमा होण्यासाठी शेतकऱ्यांनी तातडीने केवायसी करून घ्यावी. फार्मर आयडी काढून आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे. आधार प्रमाणीकरण करताना काही अडचण आल्यास संबंधित पालक अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा,' असे आवाहन सहाय्यक निबंधक जी. टी. वडेकर यांनी केले आहे.

# मॉडेल विविधांगी प्रशालेत शिष्यवृत्ती प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** दि मॉडेल विविधांगी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय माळीनगर मधील इ. ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेतील पात्र गुणवंत विद्यार्थी स्वराज सावंत, प्रणव देवकर व सरताज मुलाणी यांचा दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मोहन लांडे यांचे हस्ते पुष्पहार व गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे यावेळी संस्थेच्या नूतन चेअरमनपदी मोहन लांडे यांची निवड झाल्याबद्दल प्रशालेचे कर्मचाऱ्यांचे वतीने त्यांचा शाल व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

विद्यार्थी स्वराज अमित सावंत याने शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी २७८ गुण मिळवून जिल्हा ग्रामीण कोट्यातून राज्यात दुसरा क्रमांक मिळविला तर प्रणव प्रशांत देवकर ३०० पैकी २५८ गुण मिळवून सोलापूर जिल्ह्यात २७ वा आणि सरताज सलीम मुलाणी ३०० पैकी २५२ गुण मिळवून सोलापूर जिल्ह्यात ५० वा क्रमांक मिळविला. अध्यक्षपदावरून बोलताना चेअरमन मोहन लांडे यांनी वर्षभरामध्ये चांगला परफॉर्मन्स दाखविणाऱ्या दोन विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रति एक हजार रुपये पारितोषिक देण्याचे जाहीर केले व यावेळी विद्यार्थ्यांनी त्याचे टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

कार्यक्रमासाठी व्यासपीठावर प्राचार्य कल्लप्पा बिराजदार, उपप्राचार्य रितेश पांढरे, पर्यवेक्षक सुनील जवरे, पालक अमित सावंत, वर्षा सावंत, आशा सावंत, प्रेमा देवकर, प्रशांत देवकर, जस्मिन मुलाणी आपल्या मुलांच्या कौतुकासाठी व्यासपीठावर उपस्थित होते.

पात्र विद्यार्थ्यांना प्रशालेचे शिक्षक नवनाथ गायकवाड, सचिन आतकर, वैशाली बनकर, मेघा जोशी, अभिजीत हेगडे, सुखधा विधाते, आशा रानमाळ, सुवर्णा पोळ, मनीषा नलवडे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी त्यांचा व पालकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन करण्यात आला

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ गायकवाड यांनी केले तर आभार रितेश पांढरे यांनी मानले.

# मच्छीमार संघर्ष समितीचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** उजनी जलाशयातील मासेमारीचा खासगी ठेका देण्याचा निर्णय तातडीने रद्द करावा, तसेच उजनी धरणावर प्रस्तावित सौरऊर्जा प्रकल्पही रद्द करावा, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य मच्छीमार संघर्ष कृती समितीच्या वतीने बुधवार, दि. १२ ऑगस्ट रोजी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील मच्छीमार मोठ्या संख्येने सहभागी झाले. उजनी जलाशयातील मासेमारीचा खासगी ठेका दिल्यास ठेकेदाराच्या मनमानी कारभाराचा फटका पारंपरिक मच्छीमारांना बसण्याची शक्यता आहे. पकडलेला मासा ठेकेदार ठरवेल त्या दराने विकण्याची सक्ती मच्छीमारांवर होऊ शकते. त्यामुळे मच्छीमारांचा पारंपरिक व्यवसाय संकटात येऊन त्यांच्या उपजीविकेवर परिणाम होण्याची भीती आंदोलकांनी व्यक्त केली. यावेळी उजनी जलाशयावरील सौरऊर्जा प्रकल्प रद्द करावा, ई-टेंडरिंगद्वारे देण्यात येणारा खासगी मासेमारी ठेका रद्द करावा आणि उजनी जलाशयातील मासेमारीचे परवाना पासेस पूर्ववत सुरू ठेवावेत, अशा विविध मागण्या करण्यात आल्या. आंदोलनात



नंदकुमार नगरे, सिताराम भोई, उज्वला परदेशी यांच्यासह अनेक मच्छीमार सहभागी झाले होते.

**'अजितदादा परत या'च्या घोषणांनी वेधले लक्ष**

आंदोलनादर म्यान 'अजितदादा परत या' असा फलक लक्षवेधी ठरला. आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, अजितदादा पवार दरवर्षी जिल्हा नियोजनाच्या माध्यमातून मासेमारी व्यवसाय करणाऱ्या बांधवांसाठी दोन कोटी रुपयांचा निधी देत होते. त्यांच्या निधनानंतर मासेमारी व्यवसाय करणाऱ्या बांधवांना कोणी वाली राहिला नसल्याची भावना व्यक्त करत आंदोलकांनी 'अजितदादा परत या...' अशा घोषणा दिल्या.

**१४,९७६ कोटींच्या सौरऊर्जा प्रकल्पाला विरोध**

उजनी धरणावर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी तब्बल १४ हजार ९७६ कोटी रुपयांचा ठेका काढण्यात येणार असल्याचे आंदोलकांनी सांगितले. धरणाच्या पाण्यावर तरंगते सौरऊर्जा पॅनल उभारल्यास पाण्याच्या गुणवत्तेवर तसेच मत्स्य उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याचा दावा त्यांनी केला.

त्याचबरोबर उजनी जलाशयातील मासेमारीचा ठेका खासगी ठेकेदारांना देण्याच्या हालचालींमुळे पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील मत्स्य व्यवसाय अडचणीत येईल. या व्यवसायावर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी चिंता आंदोलकांनी व्यक्त केली.

सौरऊर्जा प्रकल्प आणि खासगी मासेमारी ठेका रद्द करण्यात आला नाही, तर यापुढे तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य मच्छीमार संघर्ष कृती समितीच्या वतीने देण्यात आला.

# प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर व निर्मिती करु नये

## प्रांताधिकारी सचिन इथापे यांचे आवाहन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निदेर्शानुसार राष्ट्रध्वजाकरिता प्लॅस्टिकच्या वापरास व निर्मितीस मनाई आहे. भारतीय राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्लॅस्टीकचे राष्ट्रध्वज वापर व निर्मिती करण्यात येऊ नये असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

राष्ट्रध्वजाविषयीचे प्रेम, निष्ठा, अभिमान दर्शविण्याकरिता विद्यार्थी नागरिकांकडूनदेखील राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. कार्यक्रमानंतर राष्ट्रध्वज विविध सार्वजनिक ठिकाणी टाकले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. रस्त्यात इतरत्र विखुरलेले राष्ट्रध्वज बरेच दिवस नष्ट होत नाहीत. राष्ट्रप्रतिष्ठेच्या दृष्टीने ही बाब गंभीर आहे. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे त्याची विटंबना होणे हे बोधचिन्हे व नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय अपराध आहे.

खराब झालेले, राष्ट्रध्वज आढळून आल्यास ते सन्मानपूर्वक गोळा करुन नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयामध्ये जमा करावेत. तसेच नागरिकांनी ध्वज संहितेच काटेकोर पालन करावे असे आवाहनही प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

# अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्याबाबत कार्यशाळा संपन्न

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींवरील अत्याचाराला आळा घालण्यासाठी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे आणि पीडितांना जलद न्याय मिळवून देणे आवश्यक आहे. यासाठी पोलीस विभाग, प्रांताधिकारी आणि उपविभागीय दक्षता समितीच्या अशासकीय सदस्यांनी समन्वयाने काम करून नियमित बैठका घ्याव्यात, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था – बार्टी, पुणे आणि सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने "अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा 1989 व सुधारित अधिनियम 2016" या विषयावर जिल्हा नियोजन भवन, सोलापूर येथे आज एकदिवसीय प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले.

यावेळी बोलताना निऱ्हाळी म्हणाले की, सोलापूरसारख्या जिल्ह्यात या कायद्याबाबत जनजागृती होणे अत्यंत गरजेचे आहे. कायद्याच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर करून पीडितांना लवकरात लवकर न्याय मिळवून देणे हे सर्वांचे प्राधान्य असावे. पोलीस विभागाने अशासकीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे आणि ॲट्रॉसिटीचे गुन्हे जलदगतीने निकाली काढावेत. विभागीय दक्षता व नियंत्रण समितीच्या बैठका नियमितपणे व्हाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यायालयीन प्रक्रियेबाबत सरकारी अभियोक्ता यांचे मार्गदर्शन

या कार्यशाळेत जिल्हा सरकारी अभियोक्ता, जिल्हा व सत्र न्यायालय,



सोलापूर प्रदीपसिंह राजपूत यांनी न्यायालयीन प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, या प्रकरणांमध्ये जलद गतीने न्याय मिळण्यासाठी शासनाकडे विशेष पोलीस युनिटची मागणी करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या जनजागृतीपर कार्यशाळा मोठ्या प्रमाणात व्हाव्यात आणि त्यात लोकप्रतिनिधींचा सहभाग असावा. पीडितांनी कायदेशीर सल्ला घेऊन योग्य साक्षीदार उभे करावेत. पोलिसांनी तटस्थ राहून निष्पक्ष तपास करावा आणि जलद गतीने खटला न्यायालयात दाखल करावा. नागरिकांनी तपासकामात पोलिसांना सहकार्य करावे. गुन्हा दाखल करताना फिर्यादी आणि आरोपी या दोघांचेही जातीचे प्रमाणपत्र तपासणे बंधनकारक आहे. चुकीच्या किंवा सूडबुद्धीने या कायद्याचा वापर केल्यास कायद्याची धार कमी होते. त्यामुळे फिर्यादी, आरोपी, साक्षीदार, तपास अधिकारी आणि न्यायाधीश या सर्वांनी प्रामाणिकपणे काम केल्यास खटले लवकर निकाली निघतील, असे त्यांनी सांगितले.

कायद्याविषयी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा 1989 हा अनुसूचित जाती-जमातीच्या सदस्यांवरील अत्याचार रोखण्यासाठी आणि त्यांना सामाजिक न्याय व सन्मानाने जगता यावे यासाठी करण्यात आला आहे.

2015 मध्ये झालेल्या सुधारणांनुसार 2016 पासून हा अधिनियम अधिक कडक करण्यात आला. यात अत्याचाराच्या नवीन गुन्ह्यांचा समावेश करण्यात आला असून, तपास आणि खटला जलद गतीने पूर्ण करणे, पीडितांना तातडीने आर्थिक मदत, संरक्षण आणि पुनर्वसन देणे यावर भर देण्यात आला आहे. कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा व राज्यस्तरावर दक्षता व नियंत्रण समित्या कार्यरत आहेत.

कार्यशाळेचा उद्देश आणि प्रास्ताविक बार्टी, पुणे येथील विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी केले. तर ॲड. देवयानी किणगी यांनी कायद्यातील तरतुदींवर पोलीस अधिकारी आणि अशासकीय सदस्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांनी केले.

या कार्यशाळेला जिल्हा सरकारी अभियोक्ता प्रदीपसिंह राजपूत, प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, प्रांताधिकारी सचिन इथापे, प्रांताधिकारी माळशिरस विजया पांगारकर, पोलिस उपअधीक्षक विजया कुरी, पोलीस विभागातील अधिकारी, जिल्हा जलसंधारण अधिकारी राहुल क्षीरसागर, जिल्ह्यातील दक्षता समितीचे अशासकीय सदस्य आणि समाज कल्याण तसेच आणि संबंधित विभागाचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी खरेदीसाठी दरपत्रक देण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा माहिती कार्यालयातील (सोलापूर) वर्तमानपत्रांची रद्दी विकण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत असून इच्छुकांनी (शॉप ॲक्ट लाईसन्स आवश्यक) या कार्यालयाची रद्दी खरेदी करण्यासाठी दरपत्रक सादर करावीत, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी सोलापूरच्या वतीने करण्यात येत आहे.

जुन्या वर्तमानपत्रांची रद्दी (मराठी व इंग्रजी), जुने मासिके पाहण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय, येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध असून , दरपत्रके तीन प्रतीत बंद पाकीटात जिल्हा माहिती अधिकारी ,जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर. या नावाने नवीन प्रशासकीय इमारत, तळमजला क विभाग, सोलापूर –1. या पत्यावर पाठवावीत. दरपत्रके स्विकारण्याची अंतिम तारीख 19 ऑगस्ट 2026 अशी आहे.

# प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजाची निर्मिती व विक्रीस मान्यता नाही

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने दिलेल्या निदेर्शानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लॅस्टिकच्या वापरास मान्यता नाही. त्यामुळे प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजाची निर्मिती तसेच विक्री करण्यास मान्यता नाही.

नागरिकांनी याची नोंद घेऊन राष्ट्रध्वजाचा सन्मान राखावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी केले आहे.

१५ ऑगस्ट २०२६ रोजी भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रध्वजाचा वापर करताना ध्वजसंहितेतील नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. राष्ट्रध्वज रस्त्यावर अथवा अन्य ठिकाणी फेकून देऊ नये. राष्ट्रध्वज खराब झालेला किंवा वापरण्यायोग्य नसल्याचे आढळल्यास ध्वजसंहितेतील तरतुदीनुसार त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

राष्ट्रध्वजाचा अवमान अथवा विटंबना करणे हे बोधचिन्ह व नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम, १९५०, राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम, १९७१ तसेच ध्वजसंहितेतील तरतुदींनुसार दंडनीय अपराध आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करताना राष्ट्रध्वजाचा सन्मान राखून ध्वजसंहितेतील नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी केले आहे.

# 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत भव्य तिरंगा पदयात्रा उत्साहात संपन्न

## तालुका प्रशासनाकडून आयोजन; विद्यार्थी,नागरिकांचा उत्स्फुर्त सहभाग

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** नागरिकांमध्ये राष्ट्राभिमान, देशभक्ती निर्माण व्हावी तसेच भारतीय स्वातंत्र्याचा ज्वाजल्य इतिहासाचे सर्व नागरिकांना स्मरण व्हावे, देशाच्या राष्ट्रध्वजाबद्दलचा सन्मान, अभिमान आणि राष्ट्रभक्तीची भावना अधिक दृढ व्हावी, तसेच स्वातंत्र्यलढ्यातील वीर स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग व बलिदानाचे स्मरण पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने पंढरपूर तालुका प्रशासनाकडून भव्य तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

या पदयात्रेत हातात तिरंगा आणि मनात राष्ट्रभक्तीची भावना घेऊन पदाधिकारी, प्रशासकीय



अधिकारी- कर्मचारी, विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. तिरंग्याच्या सन्मानार्थ दिलेल्या घोषणांनी आणि देशभक्तीच्या उत्साहाने संपूर्ण परिसर राष्ट्रप्रेमाने भारावून गेला. या तिरंगा पदयात्रेच्या माध्यमातून राष्ट्राची एकता, अखंडता आणि राष्ट्रभक्तीचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरु झालेली तिरंगा पदयात्रा चौफाळा – नाथ चौक – तांबडा मारुती – महाद्वार – कालिका माता मंदिर – काळा मारुती –चौफाळा मार्गे येऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे समारोप करण्यात आला.

सदर रॅलीमध्ये आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, प्रांताधिकारी सचिन इथापे , सहायक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, तहसिलदार सचिन लंगुटे, भुमी अभिलेख उप अधिक्षिक पुजा आवताडे, तालुका पोलीस निरिक्षक, सुरेश चिल्लावार तसेच विविध विभागाचे विभाग प्रमुख, अधिकारी-कर्मचारी, नगरसेवक, मान्यवर पदाधिकारी, विविध विद्यालयाचे विद्यार्थी व नागरिकांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला.

# शासकीय ध्वजारोहण समारंभाचे आयोजन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** भारताचा 80 व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे शनिवार दिनांक 15 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी 9.05 वाजता ध्वजारोहणाचा शासकीय समारंभ होणार आहे.

उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहणाचा समारंभ संपन्न होणार असून, या समारंभास मान्यवर नागरीक, स्वातंत्र्य सैनिक तसेच शासकीय-निमशासकीय कर्मचा-यांनी उपस्थित रहावे असे, आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.